CR1979101901

निवृत्ती वेतनाची तथा सेवा उपदानाची पहिली अदायगी आणि मनीऑर्डरद्वारा - निवृत्ती वेतनाची अदायगी विकेंद्रीकरण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
परिपत्रक क्रमांक टीआरडब्ल्यू-१३७९/१६१/सीआर-७९/एडीएम-९,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ ऑक्टोबर १९७९.

पहा :- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक टीआरडब्ल्यू-१३७७/६१३/एडीएम-९, दिनांक ४ ऑगस्ट १९७७.

२) शासकीय परिपत्रक वित्त विभाग क्रमांक टीआरडब्ल्यू-१३७८/२२९३/सीआर-७८/एडीएम-९, दिनांक १९ जानेवारी १९७९.

<u>परिपत्रक ज्ञापन</u> :- शासन परिपत्रक क्रमांक टीआरडब्ल्यू-१३७८/२२९३/सीआर-७८/एडीएम-९, दिनांक १९ जानेवारी १९७९ अन्वये निवृत्तिवेतन धारकांच्या पहिल्या आगमना प्रसंगी त्यांना ओळखण्याचे अधिकार पुन्हा उपकोषागार अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत. तेव्हापासून, निवृत्तिवेतन तथा सेवा उपदानाची रक्कम तसेच मनीऑर्डरद्वारा प्रदान करण्यात येणाऱ्या मासिक निवृत्तिवेतनाच्या रकमेच्या अदायगीत होणारा विलंब टाळण्यासाठी, निवृत्तिवेतन धारकाच्या प्रथम ओळखीच्या वेळेसच त्यास त्याच्या निवृत्तिवेतन तथा सेवा उपदानाची रक्कम अदा करण्याबाबतचे तसेच त्यानंतर मनीऑर्डरद्वारा मासिक निवृत्तिवेतन प्रदान करण्याबाबतचे अधिकार उपकोषागार अधिकाऱ्यांना देण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. ह्या प्रश्नावर काळजीपूर्वक असा सर्वंकष विचार केल्यावर निवृत्तिवेतन धारकांच्या प्रथम ओळखीच्या वेळेसच त्यांना त्यांच्या निवृत्तिवेतनाची (मागील बाकी असल्यास, तीसह) रक्कम तथा सेवा उपदानाची ( Service Gratuity ) आणि मृत्यु-नि-सेवा निवृत्ति उपदानाची ( Death-cum-Retirement Gratuity ) रक्कम (दोन्ही रोखीमध्ये) उपकोषागार अधिकाऱ्यांनी प्रदान करण्यास शासन मान्यता देत आहे. उपकोषागार अधिकाऱ्यांनी, निवृत्तिवेतन तथा सेवा उपदानाच्या रकमेच्या प्रथम अदायगीच्या वेळेसच निवृत्तिवेतन धारकांकडून शासन निर्णय क्रमांक टीआरडब्ल्यू-१३७८/६१३/एडीएम-९, दिनांक ४ ऑगस्ट १९७७ च्या परिच्छेद २ (दोन) मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे निवृत्तिवेतन धारक ज्यांचे मासिक निवृत्तिवेतन पोस्टाद्वारे अथवा बँकेद्वारे धनादेशाने घेऊ इच्छितो या बाबतचे प्रतिवेदन ( Declaration Slip ) भरून द्यावे.

२. निवृत्तिवेतन धारकांची योग्य प्रकारे ओळख पटल्यावर व निवृत्तिवेतन धारकास त्याच्या निवृत्तिवेतनाच्या मोबदल्यात परिवर्तित रक्कम ( Commutted Value ) देण्यासंबंधीचे आदेश संबंधित महालेखापाल ह्यांनी/कोषागार अधिकाऱ्यांनी त्यांच्या उपकोषागाराकडे वितरणासाठी पाठविल्यास, उपकोषागार अधिकाऱ्याने निवृत्तिवेतनाची परिवर्तित रक्कम संबंधित निवृत्तिवेतन धारकास प्रदान करण्यासही शासन मान्यता देत आहे. अशा वितरणाचा दिनांक त्यांनी कोषागार अधिकाऱ्यास कळवून संबंधित कागदपत्रे कोषागाराकडे पाठवावी.

शामुमु-रोटा-विवि-एच-९१९(७०००+५-११-७९)

दु. मा. प.

३. शासनाकडून असे स्पष्ट करण्यात येते की, मृत्यु-नि-सेवा उपदानाची सुधारित/अतिरिक्त रक्कमही उपकोषागार अधिकारी वितरीत करु शकतील. मात्र तत्पूर्वी त्यांनी निवृत्तिवेतन धारकाकडून सेवा उपदानासंबंधीचे आदेशावरच निवृत्तिवेतन धारकाची पैसे मिळाल्याची पोच घेणे आवश्यक असून ते सेवा उपदानाचे आदेश महालेखापालांकडे योग्य ती नोंद उपकोषागार/कोषागारात घेऊन परत करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

गो. भा. ओक,
उप सचिव,
महाराष्ट्र शासन, वित्त विभाग.

प्रति -

१) मुख्य मंत्री यांचे सचिव,
२) मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
३) राज्यपालांचे सचिव,
४) महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई (६० प्रती),
५) महालेखापाल, महाराष्ट्र २, नागपूर (४० प्रती),
६) सर्व मंत्रालयीन विभाग,
७) सर्व विभाग/कार्यालय प्रमुख,
८) सर्व कोषागार/उपकोषागार अधिकारी,
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
*११) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
*१२) सचिव, लोकसेवा आयोग, मुंबई,
*१३) प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त कार्यालय, मुंबई,
*१४) प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*१५) प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१६) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र (१५ प्रती),
१७) उप संचालक, लेखा व कोषागारे, पुणे/नागपूर.

OFFICE OF THE
SETTLEMENT COMMISSIONER AND
DIRECTOR OF LAND RECORDS,
MAHARASHTRA STATE,
POONA.

---

K.W.PC

क्रमांक - लेखा-33६/सी.आर.१५५१/अ-३१७९
पुणे दिनांक 31 डिसेंबर १९७९

For S.C.&D.L.R.
Pune

सर्व उपसं.भू.अ. यांना माहितीसाठी सादर अग्रेषित

(स्वाक्षरी)
कार्यासन अधिकारी अ-3